# जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद.

जा.क्र. संगणक/ ९३६७ /२०१९

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद

दिनांक : १६ /०२/२०१९

## जाहीर सूचना

### निरूपयोगी, कालबाहय संगणक व आय.टी. साहित्याचे विक्रीबाबत सूचना

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथील जुन्या, निरूपयोगी, नादुरूस्त संगणक, प्रिंटर व तत्सम आय.टी. साहित्याची (जेथे आहे तेथून आणि जशी आहे तशी याप्रमाणे) विक्री करावयाची आहे.

सोबत साहित्याची यादी असून नमूद साहित्य या कार्यालयामध्ये दिनांक १६ /०२/२०१९ पासून ते दिनांक २५ /०२/२०१९ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत प्रत्यक्ष पाहता येईल.

तरी इच्छूक खरेदीदारांनी नमूद अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमूद कालावधी व वेळेमध्येच सीलबंद दरपत्रके या कार्यालयास सादर करावीत.

**(ओमप्रकाश प. जयस्वाल)**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश
उस्मानाबाद

सोबत साहित्याची यादी.
(साहित्य अ.क्र. १ ते ७)

**नियम व अटी :**

१. सादर केलेले दरपत्रक हे जोडलेल्या साहित्याच्या यादीतील सर्व साहित्यासाठी असावे. (साहित्य अ.क्र. १ ते ७)

२. खरेदीदाराने दरपत्रकासोबत आधारकार्ड / पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

३. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

४. दरपत्रक मान्य/ अमान्य अथवा पूर्णपणे रद्द करण्याचे सर्व अधिकार कार्यालयानी राखुन ठेवले आहेत.

५. अधिकतम दर सादर करणा—या खरेदीदारास कळविण्यात आल्यानंतर संबंधितानी पुढील ०५ दिवसाचे आत (सुट्टीचे दिवस वगळून) दरपत्रकातील नमुद खरेदी रकमेचा भरणा दिलेल्या सुचनेप्रमाणे चलनाद्वारे नियोजित खात्यावर किंवा कार्यालयात जमा करून त्याची प्रत लेखी टिपणीसह या कार्यालयास सादर करावी. यानंतरच खरेदी केलेले साहित्य घेउन जाण्यास लेखी परवानगी देण्यात येईल.

६. मुद्दा क्र. ५ प्रमाणे खरेदीदारास साहित्य खरेदीची रक्कम भरणेबाबत अवगत केलेनंतर मुदतीत रक्कम न भरल्यास देण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येतील.

७. मुद्दा क्र. ५ ची पूर्तता केल्यानंतर निरूपयोगी साहित्य ०७ दिवसाचे आत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व

कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे. तद्नंतर प्रती दिन रू. १००/– (शंभर रूपये) दंड आकारण्यात येईल. १० दिवसांचे आत साहित्य ताब्यात न घेतल्यास मान्य दरपत्रक रद्द करण्यात येईल व जमा केलेली रक्कम परत केली जाणार नाही.

८. साहित्य ताब्यात घेताना भांडाराचे / इमारतीच्या मालमत्तेचे काहीही नुकसान झाल्यास खरेदीदारास झालेल्या नुकसानीबाबत जबाबदार धरण्यात येईल.

९. खरेदीदारास खरेदी रक्कमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यातून कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र खरेदीदारास मिळणार नाही.

१०. विक्री मुल्यावर नियमानुसार सेवा व वस्तु कर (जी.एस.टी.) भरण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

११. खरेदी केलेले साहित्य स्वत:च्या जबाबदारीवर घेवून जावे लागेल. त्याकरीता वाहतूक खर्च वा अन्य रक्कम / सोय कार्यालयाकडून उपलब्ध केली जाणार नाही तसेच साहित्य ज्या स्थितीत जेथे आहे तसेच ताब्यात देण्यात येईल.

१२. खरेदी प्रक्रियेबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे क्षेत्र उस्मानाबाद राहील.

**याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता :**
सहा. अधिक्षक, गेविले विभाग, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद.

व सर्व तालुका न्यायालय, यांना देवून सूचित करण्यात येते की, सदरची जाहीर सुचना जिल्हा/ तालुका न्यायालयाचे नोटीस बोर्डवर डकविण्याची कार्यवाही करावी व कार्यवाहीचा अहवाल या न्यायालयास पाठविण्यात यावा.

# साहित्याची यादी

| अ.क. | संगणक वस्तुचे नांव | संगणक वस्तुंची संख्या | मुळ किंमत प्रत्येकी रू. | घसारा काढलेनंतरची किंमत प्रत्येकी रू. |
|---|---|---|---|---|
| १ | हाय एण्ड सर्व्हर INFINITI GLOBAL LINE 2700 BD | १ | १६६४०० | ७०० |
| २ | मिड रेंज सर्व्हर INFINITI GLOBAL LINE 2700 BD | १ | १३२००० | ६०० |
| ३ | पर्सनल कॉम्पयुटर (P-IV) | १२ | २४५०० | १०० |
| ४ | एच.सी.एल. थिनक्लाइंट Winbee 4000 BVX | २८ | १४०४३ | १०० |
| ५ | प्रिंटर SAMSUNG LASERJET ML 1710 P | ८ | ९००० | १०० |
| ६ | प्रिंटर Wep LASER 2500 DN | २ | २३५०० | १०० |
| ७ | व्ही.एक्स.एल. मॉनीटर | ३ | १५५०० | १०० |